आर.सी.सी.७६७/२०१४
शासन वि. दिपक
नि.क्र.१७

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ चा शपथेवर जबाब
माझे नांव — महेंद्र पारसमल गादीया,
माझे वय – ५४ वर्ष , धंदा : मेडीकल दुकान.
राहणार – करवा नगर, जालना, ता. जि. जालना.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जे. डी. राठोड यांच्यामार्फत सूरू**

०१. घटना दि.१२.०२.२०१४ रोजी रात्री ११.०० ते ११.३० वाजेच्या दरम्यान सुभाष नगर येथील माझ्या मेडीकल दुकानात घडली. मी दुकान बंद करुन घरी गेलो होतो. त्यानंतर शहानवाज कुरेशी याचा मला फोन आला. त्याने मला सांगितले की, मेडीकल दुकानाचे शटर उघडे आहे व कॅशबॉक्स एका व्यक्तीच्या हातात आहे. मी घटना ठिकाणी गेलो. मला माझ्या दुकानाचे शटर उघडे दिसले. चोराला ताब्यात घेतले होते. पोलीस त्याला घेऊन गेले होते. माझ्या दुकानातुन ₹४५०/– ते ₹५००/– चे नाणे चोरीस गेले होते. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येते. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकत नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. वाय. भवानीवाले यांच्यामार्फत सुरु–**

०२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानाच्या आजुबाजुला इतर दुकाने आहेत. मेडीकल दुकान माझ्या मालकीचे असल्याबाबत मी पोलीसांना कागदपत्रे दिली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद अनोळखी इसमाविरुध्द दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मेडीकल दुकानात चोरी झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

(सि. म. पाडोळीकर)

दि. १६.०३.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.